# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

## ●  कंत्राटी पदभरती जाहिरात  ●

**जाहिरात क्रमांक : रातुमनावि/सा.प्र./४५२** **दिनांक : ७ जून, २०१८**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात संगणकीय कामासाठी **कंत्राटी पद्धतीवर दैनिक वेतनिक तत्वावर ११ महिन्याच्या कालावधीकरिता** संगणकीय व मौखिक परीक्षेच्या माध्यमातून, गुणवत्तेच्या आधारावर उमेदवारांची निवड करून त्यांची प्रतिक्षा यादी तयार करावयाची आहे. प्रशासकीय निकड व आवश्यकता विचारात घेवून **दरमहा रू.१२,०००/- (रूपये बारा हजार फक्त)** वेतनावर सदर प्रतिक्षा यादीतील कर्मचाऱ्यांची क्रमनिहाय वेळोवेळी नियुक्ति करण्याबाबतची कार्यवाही घेण्यात येणार आहे.

त्यानुसार, सदर पदासाठी इच्छुक असलेल्या अर्जदारांकडून आवेदनपत्र मागविण्यात येत आहे.

वरील पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, पात्रतेच्या इतर निकषासंबंधीची विस्तृत माहिती आणि अर्जाचा विहित नमुना विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

करिता, इच्छुक अर्जदारांनी जाहिरातीत नमूद सर्वसाधारण सुचनांचे लक्षपूर्वक वाचन करून पात्रतेच्या बाबींची पूर्तता करीत असल्यास विहित नमुन्यात माहिती भरून आवश्यक सहपत्रांसह एकूण **पाच प्रतीत** आपला अर्ज विद्यापीठात **दिनांक २१ जून, २०१८ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत** सादर करावा.

---

## "संगणकीय कामासाठी दैनिक वेतनिक" या पदाच्या पात्रतेचे निकष

**शैक्षणिक अर्हता :-**

इयत्ता १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**संगणक अर्हता :-**

उमेदवारांना MS-CIT या संगणकीय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे.

***किंवा***

महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा. प्र. वि.) विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ मध्ये नमुद संगणकीय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**वयोमर्यादा :-**

सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील.

**प्राधान्य :-**

संगणकीय कामाचा अनुभव धारण करीत असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

## अर्जदारांसाठी सर्वसाधारण सूचना

उमेदवारांनी आपले अर्ज भरण्यापूर्वी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, इत्यादी बाबी पडताळून पाहाव्यात. तसेच खालील सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.

१) सदर पदासाठी उमेदवारास **मराठी भाषेचे ज्ञान** असणे आवश्यक आहे.

२) आवेदकांनी विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्येच टंकलिखित, हस्तलिखित किंवा संगणकीय प्रिंट केलेला अर्ज (परिपूर्ण भरलेला अर्जाचा नमुना व संबंधित प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती) **एकूण पाच प्रतीत** सादर करावा. विहित नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये/रकान्यामध्ये कुठलाही बदल करू नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य त्या ठिकाणी नमूद करावे. **अर्जदाराने आवेदनपत्रातील "प्रपत्र-अ" मध्ये माहिती भरणे अत्यावश्यक आहे. सदर प्रपत्रात माहिती सादर न केल्यास अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.**

३) अर्जदाराने अर्जाच्या **किमान दोन प्रतीत** विहित नमुन्यात दर्शविलेल्या स्थानी स्वत:चा स्वसाक्षांकित केलेला फोटो चिटकवावा.

**४)** अर्जासोबत शैक्षणिक, अनुभव, वय, जात, जातवैधता, इत्यादी आवश्यक व लागू असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित प्रती जोडाव्यात. **अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे जोडू नयेत**

**५) सदर पदासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारास संगणकीय परीक्षेबाबत पत्ररूपाने/ई-मेल द्वारे/भ्रमणध्वनीवर कळविण्यात येईल.**

**६) मौखिक परीक्षा / मुलाखतीस पात्र ठरणाऱ्या उमेदवारास स्वतंत्रपणे पत्रव्यवहार केला जाईल.**

७) मुलाखतीस उपस्थित राहतेवेळी उमेदवाराने सर्व आवश्यक व संबंधित प्रमाणपत्रांच्या **मुळ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे.**

८) अर्जदाराने आपला अर्ज सर्व दस्तावेजांसह लिफाफ्यात भरून **"संगणकीय कामासाठी दैनिक वेतनिक" या पदासाठी अर्ज** असे लिफाफ्यावर लिहून **"मा. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परीसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, महाराजबाग जवळ, अमरावती रोड, नागपूर - ४४० ००१"** या पत्त्यावर **दिनांक २१ जून, २०१८ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत** पोहचेल अशा बेताने पाठवावे. यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा कुठल्याही परिस्थितीत विचार केल्या जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

९) सुवाच्च्य अक्षरात नसलेले, अपूर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहित नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अहर्ता व अनुभव धारण करीत नसलेले, वयोमर्यादेत मोडत नसलेले, अर्जासोबत अर्हता, अनुभव, वय, इत्यादी लागू असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित नसलेल्या प्रती जोडलेले अर्ज, टपालखात्याच्या दिरंगाईमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उशीरा प्राप्त झालेले, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच सर्व प्रमाणपत्रांसह पाच प्रतींमध्ये नसलेले अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही व त्याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**१०) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता, अनुभव व वय हे अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यत ग्राहय धरण्यात येईल.**

११) इ-मेल किंवा फॅक्सद्वारे प्राप्त झालेले अर्ज रद्द समजण्यात येतील.

१२) अर्जाच्या छाननीअंती अर्जदार अपात्र ठरल्यास याबाबतची माहिती संबंधित अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविली जाणार नाही.

१३) उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधित अधिकारी व सेवकांवर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण तथा राजकीय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारांस अपात्र समजले जाईल.

१४) संगणकीय व मौखिक परीक्षा/मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१५) विद्यापीठ प्रशासनाद्वारे आयोजित संगणकीय व मौखिक परीक्षा/मुलाखतीस पाचारण करण्यात येणाऱ्या संबंधीत उमेदवाराची ठराविक दिवशी प्रशासनाच्या कोणत्याही अडचणीमुळे चाचणी/मुलाखत पार न पडल्यास अशा संबंधीत उमेदवारांची प्रशासनाच्या निर्देशान्वये इतर दिवशी चाचणी/मुलाखत आयोजित करण्यात येईल व त्याकरिता संबंधीत उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१६) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीउपरांत उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड/नियुक्ति तात्काळ रद्द करण्यात येईल व तो उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र होईल.

१७) पदाच्या संख्येत वाढ किंवा घट झाल्यास, जाहिरातीत बदल किंवा दुरूस्ती करण्याबाबत, तसेच संपूर्ण जाहिरात रद्द करण्याबाबतचे अधिकार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने राखून ठेवले आहे.

**कुलसचिव**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ